**नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु. डी.**

यांचे न्यायालयात

रे. मु. नं. ६४८/२०१५

**वादी**

बाबासाहेब आसाराम रावडे, वगैरे

**प्रतिवादी**

ग्रामपंचायत कांगोणी, वगैरे

**याकामी वादी तर्फे सरतपासणीचे ॲफिडेव्हिट..**

**याकामी मी बाबासाहेब आसाराम रावडे, वय ६५, धंदा शेती, रा. कांगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर सरतपासणीचे ॲफिडेव्हिट स्वत: करीता व वादी नं.१ ते ३ करीता करतो की,**

१) सदर नंबर मजकुरचा दावा आम्ही प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत १अ ग्रामपंचायत घर नंबर ६५ मालमत्तेचे वर्णन लांबदी रुंदी ९४X ४० = ३७६० स्के. फुट सहान जागा यासी चर्तुसिमा पुर्व ६५ पैकी कुलकर्णी, दक्षिण घर नं.६६, पश्चिम रस्ता व घर नं.६४, उत्तर सरकारी जागा, दावा मिळकत १ब ग्रामपंचायत घर नंबर ६६ मालमत्तेचे वर्णन लांबी रुंदी ४३ X २८ = १२०४ स्के. फुट सहान जागा यासी चर्तुसिमा पुर्व घर नं.६६ पैकी, दक्षिण रस्ता, पश्चिम घर नं.६५, उत्तर सरकारी गावठाण येणेप्रमाणे कांगोणी ग्रामपंचायत हद्दीतील सहान जागा मिळकती त्यातील संपूर्ण दगड, माती, धोंडा. विटासहित तसेच त्याच्या संपूर्ण इजमेंटरी राईटम तसेच त्यातील तृण, पाषाणं वगैरे सर्व प्रकारच्या वहिवाटीच्या हक्कार्माह काहीही एक न राखून ठेविता.

२) दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीपैकी ग्रा.पं.मि. नं.६६ चे पुर्वेकडील हिस्याचे रजिस्टर्ड खरेदीखत वादी तान्हाजी आसाराम

सहा. अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर
नेवासा

रावडे आणि मी अच्युत दत्तात्रय कुलकर्णी यांचेपासून ता. १४/०८/२००६ रोजी खरेदी घेतलेले होते व आहे. तसेच दावा मिळकत ग्रा.पं.घ.नं.६६ पै. पश्चिमेकडील हिस्याचे जिस्टर्ड खरेदीखत वादी बाबासाहेब आसाराम रावडे आणि नामदेव आसाराम रावड यांनी दिगंबर रामचंद्र कुलकर्णी यांच्यापासून ता. १७/०८/२००६ रोजी खरेदी घेतलेले होते व आहे. तसेच दावा मिळकत ग्रा.पं.मि.नं.६५ चे खरेदीखत वादी तान्हाजी आसाराम रावडे आणि मी म्हणजेच आम्ही दोघांनी लक्ष्मण मोहनराज कुकडे याचे जनरल मुखत्यार वैशाली दिलीप कुलकर्णी हिचेपासून ता. २२/०८/२००६ रोजी खरेदी घेतलेले होते व आहे. याप्रमाणे दावा मिळकती हया आमच्या कायदेशीर रजिस्टर्ड खरेदीखताने कायदेशीररित्या खरेदी घेतलेल्या आणि कायदेशीररित्या मालकी, कब्जाच्या होत्या व आहेत. याप्रमाणे दावा मिळकतीवर आमची वर वर्णन केलेल्या रजिस्टर्ड खरेदीखताच्या तारखेपासून प्रत्यक्ष कब्जा मालकी हक्काने होता व आहे. याप्रमाणे सदर दावा मिळकती हया आमच्या गेल्या नऊ वर्षापेक्षा देखील जास्त कालावधीपासून कायदेशीररित्या मालकी, कब्जेवहिवाटीत होत्या व आहेत. याप्रमाणे दाव्याच्या मिळकतीवर आमचे कायदेशीर मालकी आणि कायदेशीर कब्जा हा स्पष्ट होता व आहे आणि याप्रमाणे सदर दावा मिळकती वर प्र.वादींचा किंवा इतर कोणाही व्यक्तींचा कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही स्वरुपात मालकी हक्क, कब्जा, वहिवाट, हितसंबंध नव्हता व नाही आणि असण्याचे कारण देखील नाही.

३) सदर प्र.वादी नं.१ ही कांगोणी ग्रामपंचायत असून प्र.वादी नं.२ हा कांगोणी ग्रामपंचायतीचा ग्रामसेवक आहे. तसेच प्र.वादी नं.३ ते ७ हे दावा मिळकतीच्या आमच्या मालकी, कब्जेहिवाटीस हरकत, अडथळे करणार त्रयस्थ इसम आहेत. सदर प्र.वादी नं.१ व २ यांच्यामार्फत सदर आमच्या दाव्याच्या मिळकतीमधून बळजबरीने जे.सी.बी. द्वारे रस्ता काढण्याचे प्रयत्न प्र.वादी नं.१ व २ यांनी प्र.वादी नं.३ ते ७ यांच्या मदतीने सुरु करण्याचे ठरविलेले आहे. त्याबाबतीत प्र.वादी नं. १ व २ हे आम्हाला ता.५/१०/२००१९ रोजी समक्ष भेटले आणि त्यांनी आम्हाला असे सांगितले की, तुमच्या मिळकती मधून आम्हाला रस्ता काढावयाचा आहे. तुम्ही त्याला हरकत, अडथळे करु नका,

आमच्याकडे तसा हुकुम आहे. त्यावेळेस आम्ही प्र.वादी नं.१ व २ यांना असे समजावून सांगितले की, आमच्या मालकी, कब्जाच्या सदर दावा मिळकतीमधून आपण कोणाच्या हुकुमाने रस्ता करण्याचा प्रयत्न करीत आहात, तो हुकुम आम्हाला दाखवा. त्याबाबत प्र.वादी नं.१ व २ यांनी असमर्थता दर्शविली आणि तुम्ही बऱ्या बोलाने आम्हाला रस्ता करु द्या नाही तर आम्हाला तुमचेविरुध्द पोलिस केस करावी लागेल. सदर प्र.वादी नं.१ व २ यांना प्र.वादी नं.३ ते ७ हे हरप्रकारे सहाय्य आणि मदत गैरमार्गाने करीत आहेत आणि सदर दाव्याच्या मिळकती हया प्र.वादी नं.३ ते ७ हयांना खरेदी घ्यावयाच्या होत्या. परंतू दाव्याच्या मिळकती त्यांना खरेदी घेता आल्या नाहीत आणि त्या आम्ही खरेदी घेतल्या आणि सदर प्र.वादी नं.३ ते ७ यांना त्याचा राग आहे, आणि त्यामुळे चिडूनजाऊन सदर प्र.वादी नं.३ ते ७ यांनी प्र.वादी नं.१ व २ यांना चिथावणी देऊन आणि त्यांच्या बरोबर संगनमत करुन आमच्या दाव्याच्या मिळकतीमधून बळजबरीने आणि कायदा हातात घेऊन जे.सी.बी. मशिनद्वारे रस्ता काढण्याचे आणि नवीन रस्ता प्रस्थापित करण्याचे आणि निर्माण करण्याचे प्रयत्न चालविलेले आहे. तसे झाल्यास या आमचे कधीही न भरुन येणारे आणि कशानेही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान झाले आहे. होत आणि होणार आहे.

४) सदर प्र.वादींपैकी प्र.वादी नं.३ ते ७ यांनी यापुर्वी या आमच्या विरुध्द प्रिडिसिसॉर इन टायटलचे विरुध्द एक खोटा आणि बनावट मनाई हुकुमाचा दावा रेग्युलर सिव्हील सुट नंबर ४२३/२००६ चा दाखल केला होता. सदरचा दावा या माननीय कोर्टाने ता. २३/०७/२०१३ रोजी प्र.वादी नं.३ ते ७ यांनी compliance न केल्यामुळे रद्द केलेला आहे आणि त्या निकालाविरुध्द प्र.वादी नं.३ ते ७ यांनी विलंब माफीचे अर्जासह अपिल दाखल केलेले आहे. परंतू अद्यापपावेतो त्यांचा डिले कंडोन झालेला नाही. त्यामुळे त्या अपिलाला नंबर पडलेला नाही आणि याप्रमाणे सदर प्र.वादी नं.३ ते ७ यांचा या आमचे विरुध्द दाखल केलेला रे.मु.नं.४२३/२००६ चा दावा रद्द झाल्यामुळे /डिसपोझ झाल्यामुळे चिडूनजाऊन सदर प्र.वादी नं.३ ते ७ यांनी प्र.वादी नं.१ आणि २ यांना हाताशी धरुन राजकीय दबाव आणून पुढारीपणाच्या जोरावर आणि मनगटाचे जोरावर कायदा हातात घेऊन ता.१९/१०/२०१५ रोजी आमच्या दावा मिळकतीमधून बळजबरीने

आणि कायदा हातात घेऊन आणि आमच्या दाव्याच्या मिळकतीचे नुकसान करुन रस्ता करण्याचे ठरविले आहे आणि त्यामुळे कुठलाही वेळ न घालविता आम्ही ताबडतोब प्र.वादीविरुध्द सदरचा निरंतर ताकीदीचा दावा त्वरीत दाखल केलेला आहे.

५) सदर दाव्यातील प्र.वादी नं.१ ग्रामपंचायत यांना ग्रामपंचायत कायद्याचे कलम ८० प्रमाणे नोटीस देणे आवश्यक आहे. परंतू अर्जसी क्लॉजचा विचार करता आणि प्र.वादी नं.१ व २ यांच्यातर्फे फ्युचर ॲक्शन / भविष्यातील होणाऱ्या कृत्याबाबत ग्रामपंचायतला कलम ८० ची नोटीस देण्याची आवश्यकता नव्हती व नाही आणि तसे निवाडे आपल्या माननीय मंबई उच्च न्यायालयाचे होते व आहे. प्र.वादी यांच्या कोणत्याही तथाकथीत तक्रारीला वाव राहू नये म्हणून आणि या दाव्यामध्ये आणि मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा तांत्रिक दोष राहू नये म्हणून सदरचे सुस्पष्ट प्लिडींग / कथन वादींनी abundant precaution म्हणून केलेले आहे. तसेच या आमच्याकडून सप्रेशन झाले अशी तथाकथीत तक्रार प्र. वादी यांच्याकडून होण्याची शक्यता असल्यामुळे देखील सदरचे सुस्पष्ट प्लिडींग आम्ही या दाव्यात केलेले आहे. त्यामुळे सदर कांगोणी ग्रामपंचायतला पूर्व नोटीस देण्याची आवश्यकता प्र.वादी नं.१ व २ यांच्या भविष्यातील कारवाईसाठी जरुरीची नव्हती व नाही.

६) सदर प्र.वादी नं.१ व २ यांना प्र.वादी नं.३ ते ७ यांच्या चिथावणीवरुन आमच्या दावा मिळकतीमधून रस्ता काढण्याचे कोणतेही कायदेशीर प्रयोजन नाही. कारण आमच्या दावा मिळकतीच्या जवळच सरकारी गावठाण आहे आणि ते सहान आहे आणि असे असतांना देखील आणि आमच्या दावा मिळकतीमधून रस्ता करण्याचे कोणतेही कारण कांगोणी ग्रामपंचायतला आवश्यकता नसतांना देखील सदर प्र. वादी नं.१ व २ हे प्र.वादी नं.३ ते ७यांच्या चिथावणीने सदरचे गैरकृत्य ता.१९/१०/२०१५ रोजी करणार आहेत आणि आम्हाला दावा मिळकतीतून बळजबरीने बेदखल करण्याचे प्रयत्नात आहेत.

७) आम्हाला अत्यंत उत्कृष्ट अशी प्रथमदर्शनी केस आहे. कारण आम्ही दावा मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखताने कायदेशीर मालक. कब्जेदार होते व आहे. आणि रजिस्टर्ड खरेदीखताला प्रस्थापित कायद्याच्या प्रस्थापित तत्वाप्रमाणे प्रिझमटिव्ह व्हॅल्यु होती व आहे. तसेच न्यायाचा

समतोल देखील आमच्या बाजुने होता व आहे. कारण दावा मिळकती हया गेल्या ९ वर्षापेक्षा देखील जास्त कालावधीपासून आमच्या कायदेशीर मालकी, कब्जात होत्या व आहेत. अश्या परिस्थितीत प्र.वादी नं.१ व २ यांच्या प्र.वादी नं.३ ते ७ च्या चिथावणी वरुन होणाऱ्या future action बाबत जर प्र.वादींना मनाई हुकुम न दिला गेल्यास आमचे आरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट प्र.वादींना मनाई हुकुम दिला गेल्यास प्र.वादींचे कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही स्वरुपात नुकसान होणार नाही. कारण दावा मिळकतीशी प्र.वादी नं.१ ते ७ यांचा कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, कबज वहिवाट हितसंबध नव्हता व नाही.

८) प्रतिवादी नं.३ ते ७ यांनी दिलेले म्हणणे खोटे व बनावट असुन ते आम्हाला मान्य व कबुल नाही.

९) आम्ही सदर दाव्यामध्ये दाखल केलेली संपुर्ण कागदपत्रे खरी व बरोबर असुन त्यास निशाणी नंबर देण्यात येऊन पुराव्याकामी वाचण्यात यावे.

१०) प्रतिवादी नं.१ ते ७ यांनी आमच्या दावा मिळकतीमध्ये जे. सी. बी. मशिनव्दारे अथवा इतर कोणत्याही मशिनव्दारे रस्ता तयार करु नये, रस्त्याचे काम करु नये तसेच प्रतिवादी नं.१ ते ७ तसेच त्याचे नातेवाईक, एंजट, नोकर, चाकर, यांनी देखील दाव्याच्या मिळकतीमध्ये प्रत्यक्ष येऊन आमच्या कायदेशिर हक्कास बाध येईल असे कोणतेही कृत्य करु नये तसेच प्रतिवादी नं.१ ते ७ यांनी आमच्या दाव्याच्या मिळकतीमधुन कायदा हातात घेऊन बेदखल / डिसपझेस करु नये अशी निरंतरची ताकीद प्रतिवादी नं.१ ते ७ यांना देण्यात यावी.

येणे प्रमाणे सरतपासणीचे ॲफिडेव्हिट केले असे.

नेवासा

दि.११/०८/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

**ओळख**

**ॲड. जी. आर. काकडे**

याकामी मी आबासाहेब आसाराम रावडे, वय ६५, धंदा शेती, रा. कांगोणी, ता. नेवासा, जि. अहमदनगर सत्य प्रतिज्ञेवर खरे सांगतो की, वर लिहिलेला संपुर्ण मजकुर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेसाठी मी या लेखाखाली सही केली आहे.

नेवासा

दि.११/०८/२०२५

ॲफिडेव्हिट करणार

7091 6903 3826

Solemnly affirmed before me
by Aabasaheb Asaram Rawade Age 65 Occ-शेती R/o Kangoni Tal Newasa Dist. A.nagar
who is identified before me
by Adv. J.R. Kakade
whom I personally know

Asstt. Superintendent

आज रोजी साक्षीदार हजर. प्रतिवादी व त्यांच्या विधिज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाकारला.

दि. २३/१२/२५.

२३/१२/२५

डॉ.ए.आर. मुगावकर.
दि.न्या.क.स्तर, नेवासा.